नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/१०/२०२५ (बुधवार )

## अवैधरित्या उत्खनन करून मुरूम चोरी करणाऱ्या ४ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## वेलतुर पोलीसांची कामगिरी
## ३८ लाख ५९ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— दिनांक २१/१०/२०२५ रोजी वेलतुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की,मौजा जुना गोठनगाव येथे जेसीबी च्या सहायाने मुरूमाचे उत्खनन करून ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये विनापरवाना चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळावर जात असातांना गोठनगाव रोड वर तीन ट्रॅक्टर आणि एक जेसीबी एकामागोमाग येताना दिसले. १) एक विना क्रमांचा ट्रॅक्टर मुंडा आणि त्याला जोडलेली ट्रॉली क्रमांक एम.एच. ४० सी एक्स ७९७२ चा चालक आरोपी नामे वैभव प्रदीप कांबळे , वय २३ वर्षे, पत्ता. गोठनगाव , ता. कुही जि. नागपुर, २) ट्रॅक्टर (मुंडा) क्र.एम एच ४० एल ५९०१ याला जोडलेली ट्रॉली क्रमांक एम. एच. ३६ डी ८८२७ चा चालक माधो रामचंद्र रोकडे, वय ५५ वर्षे, रा. रेंगातुर, ता कुही ३) ट्रॅक्टर (मुंडा) क्र. एम एच ३५ ऐ जी ८६७४ व त्याला जोडलेली ट्रॉली क्र. एम एच ४० एल ८२९४ चा चालक राजेश झिबल देव्हारे, वय ३९ वर्षे, रा. गोठणगाव आणि ४) विना क्रमांकाचा जेसीबी चा चालक निलेश दिगांबर निकेश्वर, वय २५ वर्षे, रा मेंढा ता कुही हे मिळुन आले.ट्रॅक्टर ची तपासणी केली असता ट्रॉली मध्ये मुरूम भरलेला होता. आरोपीतांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष १) तिन्ही वाहनातुन प्रत्येकी १ ब्रास मरूम एकुण किंमती

९,०००/— रूपये २) वर नमुद तिन ट्रॅकर ट्रॉली आणि जेसीबी असा एकुण ३८,५९,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी वरील आरोपीतांविरूध्द पोस्टे वेलतुर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २२/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत सहा. पोलीस निरीक्षक श्री जीवन लाकडे, पोलीस स्टेशन बोरी यांनी बालभारती मैदान येथे सराव करणारे विदयार्थ्यांना तसेच बाजारपेठ, बोरी येथे हजर असलेल्या नागरिकांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

१. **OLX वरील कमी किंमतीत मिळणाऱ्या वस्तुंच्या आमिषाला बळी पडु नका. समोरच्या व्यक्ती बाबत पडताळणी करूनच पैशांचा व्यवहार करा.अन्यथा तुमची आर्थिक फसवणुक होवु शकते.**

**सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी www.cybercrime.gov.in या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक 1930, 1945 यावर तक्रार नोंदवा.**


RONALDO
7



# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २१/१०/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २२/१०/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील, पोलीस उपधिक्षक गृह (प्रभारी ) यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री राजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. एम आय डी सी चौक  येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस स्टेशन बोरी चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने